## अनुसुचित जाती/नवबौध्द लाभार्थींना 02 दुभत्या जनावरांचे गट पुरवठा करणे (वि.घ.यो.)

**उद्देश :-**

अनुसुचित जाती/ नवबौध्द लाभार्थींना 02 दुधाळ जनावरांच्या गटाचा पुरवठा 75 टक्के अनुदानावर करुन आर्थीक उत्तपन्नात वाढ करणे.

**स्वरुप :-**

- लाभार्थीस 02 संकरीत गायी किंवा म्हशींचा गट प्रती जनावर किंमत रुपये 40000/- च्या 75 टक्के अनुदानावर पुरवठा करणे.
- सदरील जनावरांचा विमा 5.75 % + 10.3% या दराने रुपये 5061/- तीन वर्षाचा विमा करण्यात येईल.
- एका लाभार्थीस 02 जनावरांच्या गटासाठी 75% (रुपये 63796) शासकिय अनुदान देय राहील.
- स्वहिस्सा 25% रक्कम लाभार्थीने स्वत: उभा करावी लागेल.
- बँक /वित्तीय संस्थेकडून कर्ज घेणाऱ्या (अनु.जातीसाठी 5% लाभार्थी हिस्सा व 20 % बँकेचे कर्ज) लाभार्थ्यास या योजने अंतर्गत प्राधान्य देण्यात येईल.

**निकष :- लाभार्थींची निवडीचा प्राधान्यक्रम**

- दारिद्र रेषेखालील लाभार्थी
- अत्यल्प भूधारक शेतकरी
- अल्प भूधारक शेतकरी
- सुशिक्षित बेरोजगार (रोजगार व स्वयंरोजगार केंद्रात नोंद असलेले)
- महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. 1 ते 4 मधील )
- अ.क्र. 1 ते 4 मधील 30% महिला लाभार्थ्यांना प्राधान्य
- अ.क्र. 1 ते 4 मधील 3% विकलांग लाभार्थ्यांना प्राधान्य

**योजनेच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना**

- परिपूर्ण अर्ज पशुवैद्यकीय संस्थे मार्फत पशुधन विकास अधिकारी (वि.) पंचायत समिती यांचे स्तरावर स्विकारण्यात येतील.
- जुन-जुलै महिन्यात अर्ज मागविण्यात येतील. अर्ज स्विकरण्यासाठी एक महिन्याची मुदत राहील. मुदतीनंतर अर्ज स्विकराले जाणार नाहीत. कोणत्याही स्वरुपात सदरील अर्ज पुढील आर्थिक वर्षासाठी ग्राहय धरला जाणार नाही.
- लाभार्थीची निवड जिल्हा लाभार्थी निवड समितीद्वारा करण्यात येईल.
- लाभार्थीची निवड झाल्यावर लाभार्थीनी एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थी हिस्सा रक्कम अथवा बँकेचे कर्ज उभारणे आवश्यक राहील. तसे न केल्यास प्रतिक्षा सुचिवरील लाभार्थीस लाभ देण्यात येईल.
- एका कुटूंबातील एकाच व्यक्तीस या योजनेचा लाभ देण्यात येईल. तत्सम योजने अंतर्गत लाभ दिलेल्या लाभार्थीस पुन्हा सदर योजनेचा लाभ देण्यात येणार नाही.
- प्रथमत: एका दुधाळ जनावरांचे वाटप करण्यात येईल व सहा महिन्यानंतर दुसरे दुधाळ जनावर वाटप करण्यात येईल.
- लाभार्थ्यांने हा व्यवसाय किमान 3 वर्षे करणे बंधनकारक राहील.
- पडताळणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांना वाटप केलेली दुधाळ जनावरे दाखविणे आवश्यक आहे.
- लाभार्थ्याकडे 02 दुधाळ जनावरांचे पालन करण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध असावी.

# अनुसुचित जाती/नवबौध्द लाभार्थींना शेळ्या-मेंढ्या गटाचा पुरवठा करणे (वि.घ.यो.)

**उद्देश :-**

अनुसुचित जाती/ नवबौध्द लाभार्थींना 10 शेळ्या व 1 बोकड गटाचा पुरवठा 75 टक्के अनुदानावर करुन आर्थीक उत्तपन्नात वाढ करणे.

**स्वरुप :-**

- शेळ्या खेरदी रु. 6000/- प्रती शेळी — रुपये 60000/-
- 1 बोकड खरेदी — रुपये 7000
- विमा 5.75+10.03% — रुपये 4239
- **एकूण :-** — **रुपये 71239**
- एका लाभार्थीस शेळयांच्या गटासाठी 75% (रुपये 53429) शासकिय अनुदान देय राहील.
- स्वहिस्सा 25% रक्कम लाभार्थीने स्वत: उभा करावी लागेल.
- बँक /वित्तीय संस्थेकडून कर्ज घेणाऱ्या (अनु.जातीसाठी 5% लाभार्थी हिस्सा व 20 % बँकेचे कर्ज) लाभार्थ्यास या योजने अंतर्गत प्राधान्य देण्यात येईल.

**निकष :- लाभार्थीची निवडीचा प्राधान्यक्रम**

- दारिद्र रेषेखालील लाभार्थी
- अत्यल्प भूधारक शेतकरी
- अल्प भूधारक शेतकरी
- सुशिक्षित बेरोजगार (रोजगार व स्वयंरोजगार केंद्रात नोंद असलेले)
- महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. 1 ते 4 मधील )
- अ.क्र. 1 ते 4 मधील 30% महिला लाभार्थ्यांना प्राधान्य
- अ.क्र. 1 ते 4 मधील 3% विकलांग लाभार्थ्यांना प्राधान्य

**योजनेच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना**

- परिपूर्ण अर्ज पशुवैद्यकीय संस्थे मार्फत पशुधन विकास अधिकारी (वि.) पंचायत समिती यांचे स्तरावर स्विकारण्यात येतील.
- अर्ज स्विकरण्यासाठी एक महिन्याची मुदत राहील. मुदतीनंतर अर्ज स्विकराले जाणार नाहीत. कोणत्याही स्वरुपात सदरील अर्ज पुढील आर्थिक वर्षासाठी ग्राहय धरला जाणार नाही.
- लाभार्थीची निवड जिल्हा लाभार्थी निवड समितीव्दारा करण्यात येईल.
- लाभार्थीची निवड झाल्यावर लाभार्थीनी एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थी हिस्सा रक्कम अथवा बँकेचे कर्ज उभारणे आवश्यक राहील. तसे न केल्यास प्रतिक्षा सुचिवरील लाभार्थीस लाभ देण्यात येईल.
- एका कुटूंबातील एकाच व्यक्तीस या योजनेचा लाभ देण्यात येईल. तत्सम योजने अंतर्गत लाभ दिलेल्या लाभार्थीस पुन्हा सदर योजनेचा लाभ देण्यात येणार नाही.
- लाभार्थ्याने हा व्यवसाय किमान 3 वर्षे करणे बंधनकारक राहील.
- पडताळणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांना शेळी गट दाखविणे लाभार्थ्यास बंधनकारक राहील.
- लाभार्थ्याकडे शेळी गट संगोपनासाठी पुरेशी जागा उपलब्ध असावी.
- शेळी गट खरेदी नंतर वहातूकीचा संपर्ण खर्च लाभार्थ्याने करावा.
- लाभार्थ्याने शेळी/मेंढी पालन विषयक प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील.
- अनुदानाचा गैर विनियोग केल्याचे निदर्शनास आल्यास दिलेल्या अनुदानाची व्याजासह एक रकमी वसुली महसुली कार्यवध्दतीने लाभार्थ्याकडून करण्यात यावी.

# विशेष घटक योजने अंतर्गत् (अनुसूचित जाती व नवबौध्द) लाभार्थीना पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षण देणे.

**योजनेचा उद्देश :-**

अनुसूचित जाती व नवबौध्द लाभार्थीना पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षण देणे

**योजनेचे स्वरुप :-**

- प्रशिक्षण वर्ग हा तिन दिवसांचा राहील.
- एका लाभार्थीवर तिन दिवसा करिता रुपये 1000/- पर्यंत खर्च करण्यात येईल.
- चहा, नाष्टा, जेवन प्रतिदिन रुपये 100/-, जाण्या येण्याचा खर्च(एसटी/ रेल्वे तिकीट पाहून) 100/-, पेन, नोंदवही, छाापील तांत्रिक माहीती रुपये 100/-, दृकश्राव्य व्यवस्था( प्रचार, बूनर्स, चार्टस) प्रशिक्षण बैठक व्यवस्था हॉल इ. अनुषंगीक खर्च रुपये 500/-
- रु. 1000/- प्रति लाभार्थी खर्च व उपलब्ध तरतुदीच्या मर्यादेत लाभार्थी संख्या ठरविण्यात येईल.
- प्रशिक्षण जनावरांच्या प्रक्षोत्रावच घेण्यात येईल, तथापी प्रशिक्षण प्रक्षेत्रावर घेणे शक्य नसल्यास इतर ठिकाणी घेण्यात येईल.
- लाभार्थी निवडतांना एकूण लाभार्थींच्या 30 टक्के महिला लाभार्थी निवडीस प्राधान्य देण्यात येईल.

**योजनेच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना**

- लाभार्थी निवडतांना 03 टक्के लाभार्थी हे वकिलांग प्रवर्गातील राहतील.
- लाभार्थी निवडतांना संबंधीत ग्राम पंचायतीचे शिफारसपत्र प्राप्त करुण घेणे बंधनकारक राहील.
- योजनेची अंमलबजावणी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद, हे असतील.
- पात्र लाभार्थी कडून विहीत नमुन्यातील अर्ज संबंधीत पशुवैद्यकीय संस्थे मार्फत संकलीत करुन पशुधन विकास अधिकारी (विस्तार) हे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद, यांचेकडे सादर करतील.

# वैरण बियाणे पुरवठा योजना

**उद्देश :-**

वैरण उत्पादनामधील कमतरता भरुन काढण्याकरीता तसेच पशुधनाला पुरेशी हिरवी वैरण उपलब्ध होण्यासाठी जास्तीत जास्त क्षेतत्रावर वैरणीचे उत्पादन घेणेसाठी प्रोत्साहन देणे.

**स्वरुप :-**

- 100% अनुदानावर बियाणांचा पुरवठा करणे.
- प्रती लाभार्थी एक एकारच्या क्षेत्राात वैरण उत्पादन घेण्यासाठी 100% अनुदानावर रुपये 600/- च्या मर्यादत वैरणीच्या बियाणांचा / ठोंबाचा पुरवठा करण्यात यावा.

**निकष :-**

- **ज्या लाभार्थीकडे स्वत:ची 3 ते 4 जनावरे आहेत अशा लाभार्थींना**
- लाभार्थीकडे वैरण उत्पादनासाठी स्वता:ची शेतजमीन व सिंचनाची सुविधा असणे आवश्यक आहे.

**योजनेच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना**

- परिपूर्ण अर्ज पशुवैद्यकीय संस्थे मार्फत पशुधन विकास अधिकारी (वि.) पंचायत समिती यांचे स्तरावर स्विकारण्यात येतील.
- या कार्यक्रमाअंतर्गत ज्वारी, मका, बाजरी, बरसीम, ल्युसर्न, न्यूट्रीफिड व इतर बियाणे वाटप करण्यात येईल.
- नेपियर, जयवंत यशवंत इ. सुधारीत बहुवर्षिय गवत प्रजातीची ठोंबे वाटप करण्यात येतील.
- खात्याच्या दर करारानुसार वैरणीच्या बियाणांचा/ठोंबाचा पुरवठा करण्यात येईल.
- वैरणीच्या पिकां/ठोंबा करीता आवश्यक खते, जिवाणू संवर्धके शेतकऱ्यांनी स्वत:च्या खर्चाने खरेदी करावीत.
- या कार्यक्रमा अंतर्गत कोणत्याही प्रवर्गातील शेतकऱ्यांना लाभ घेता येईल
- एका लाभार्थीला एका हंगामात एकदाच लाभ देण्यात येईल.

# पशुसंवर्धनासाठी प्रदर्शन व प्रचार कार्यक्रम

## उद्देश :-

पशुसंवर्धन विषयक विविध योजना व पशुसंवर्धनातील व्यवसायिक संधी यासाठी आवश्यक अनुषंगिक बाबींचा व्यापक प्रसिध्दीद्वारे प्रसार करुन ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना पशुपालन व्यवसायाकडे आकर्षित करुन त्याद्वादे सर्व थरातील शेतकरी/पशुपालक यांच्या विकासास हातभार लावणे.

### स्वरुप :-

- सदर उपयोजने अंतर्गत आयोजित पशुप्रदर्शनात सहभागी व विजयी घोषित करण्यात आलेल्या पशुपक्ष्यांना बक्षिस वाटप.
- पशुपक्ष्यांना देण्यात येणारा चारा व पशुखाद्य.
- प्रदर्शन स्थळी स्टॉल लावणे.
- पशुप्रदर्शनावरील अनुषंगीक खर्च.

### निकष :-

पशुप्रदर्शनात सहभागी होणाऱ्या विविध जातीच्या प्रत्येक गटामध्ये 10 स्पर्धक पशुपक्षी यांचा सहभाग अनिवार्य राहील.

### योजनेच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना

- 10 पेक्षा कमी सहभाग असणाऱ्या गटासाठी प्रथम, व्दितीय व तृतीय बक्षिसे न देता उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात यावीत.
- निवड समितीचा निर्णय अंतीम राहील.
- दुग्ध स्पर्धातील जनावरांच्या बाबतीत गटातील 10 जनावरांची अट अपवादात्मक परिस्थितीत शिथीलक्षम राहील.
- जनावर निवडीमध्ये वाद उद्भवल्यास पशुवैद्यकिय महाविद्यालयाच्या तज्ञाचा तांत्रिक सल्ला घेवून बक्षिस पात्रा जनावरांच्या निवडी बाबतचा अंतिम निर्णय प्रादेशिक पशुसवंर्धन सहआयुक्त यांनी घ्यावा.

# एक दिवसीय सुधारित कुक्कूट पक्षांच्या पिल्लांचे गट वाटप योजना

## उद्देश :-

ग्रामिण भागातील दारिद्र रेषेखालील लाभार्थी, भुमीहीन शेतमूर, मागासवर्गीय, अल्प व अत्यल्प भूधाकर बहू भूधारक यांना कुक्कूट पक्षांचे वाटप करुन त्यांना उत्पन्नाचे स्त्रोत उपलब्ध करुन देणे,

**स्वरुप :-**

सर्व प्रवर्गातील लाभार्थ्यांना 50% अनुदानावर प्रती लाभार्थी एक दिवसीय सुधारित कुक्कूट पक्ष्यांच्या 100 पिल्लांचे गट वाटप करणे.

| | |
|---|---|
| एक दिवसीय 100 पिल्लांची किंमत | ₹ 2000/- |
| प्रत्येक गटाबरोबर द्यावयाचे खाद्य 800 कि.ग्रॅ. | ₹ 12400 |
| वहातूक खर्च | ₹ 100 |
| औषधी | ₹ 1500 |
| रात्रीचा निवारा | ₹ 1000 |
| खाद्याची भांडी | ₹ 350 |
| एकूण :- | ₹ 16000/- |

पैकी 50% अनुदानातून ₹ 8000/- मर्यादेत एक दिवसीय 100 पिल्ले किंमत ₹ 2000/- आणि खाद्य रु 6000/- एकूण ₹ 8000/- अनुदान असेल. उर्वरीत खर्च 50% रक्कम म्हणजेच रुपये 8000/- लाभार्थ्यांने स्वत: उभारुन त्यातून एकदिवसीय 100 पिल्लांच्या गटासाठी लागणारा निवारा, वहातूकीवरील खर्च, उर्वरित खाद्यावरील खर्च. औषधी, पाण्याची भांडी, खाद्याची भांडी इ. वरील खर्च करावा.

**निकष :-**

- सदर योजनेचा लाभ कोणत्याही गटातील लाभार्थी घेऊ शकतील.
- लाभार्थी निवडताना 30% महिला लाभार्थी निवडण्या बाबत प्राधान्य देण्यात यावे.
- दारिद्र रेषेखालील लाभार्थी, भुमीहीन शेतमूर, मागासवर्गीय, अल्प व अत्यल्प भूधाकर लाभार्थी यांना प्राधान्य.

**योजनेच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना**

- परिपूर्ण अर्ज पशुवैद्यकीय संस्थे मार्फत पशुधन विकास अधिकारी (वि.) पंचायत समिती यांचे स्तरावर स्विकारण्यात येतील.
- व्यापक प्रसिध्दी देवून अर्ज मागविण्यात येतील. अर्ज स्विकरण्यासाठी एक महिन्याची मुदत राहील. मुदतीनंतर अर्ज स्विकराले जाणार नाहीत. कोणत्याही स्वरुपात सदरील अर्ज पुढील आर्थिक वर्षासाठी ग्राहय धरला जाणार नाही.
- लाभार्थींची निवड जिल्हा लाभार्थी निवड समितीव्दवारा करण्यात येईल.
- एका कुटूंबातील एकाच व्यक्तीस या योजनेचा लाभ देण्यात येईल. तत्सम योजने अंतर्गत लाभ दिलेल्या लाभार्थीस पुन्हा सदर योजनेचा लाभ देण्यात येणार नाही.